पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

*दिनांक- २५/०१/२०२१*

## मा. पोलीस महासंचालक श्री. हेमंत नगराळे सो. यांची गडचिरोली पोलीस दलास भेट.

महाराष्ट्र राज्याचे नवनियुक्त मा. पोलीस महासंचालक श्री. हेमंत नगराळे सा. यांनी नुकताच दिनांक २५/०१/२०२१ रोजी गडचिरोली पोलीस दलास भेट दिली. या दरम्यान त्यांनी शहीद स्मारकाला पुष्पचक्र अर्पण करुन मानवंदना दिली. त्यानंतर गडचिरोली जिल्ह्यात कार्यरत असतांना नक्षलवाद्यांशी लढतांना ज्या पोलीस जवानांनी प्राणाची आहुती दिली त्या वीर शहीद जवानांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी उभारण्यात आलेल्या ‘शौर्यस्थळ’या वास्तुला भेट दिली तसेच वीर शहीदांच्या कुटुंबियांच्या अडचणी जाणुन घेतल्या. या भेटी दरम्यान विशेष अभियान पथकासाठी उभारण्यात आलेल्या नविन वास्तुचे उद्‍घाटन मा. पोलीस महासंचालक सो. यांचे हस्ते करण्यात आले. तसेच पोलीस मुख्यालय, गडचिरोली येथील एकलव्यधाम येथील कार्यक्रमात, नक्षल चळवळीच्या हिंसेची वाट सोडुन लोकशाहीच्या मुख्य प्रवाहात आलेल्या आत्मसमर्पीत नक्षल सदस्यांना धनादेश वाटप व जातप्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. गडचिरोली पोलीस दलात कार्यरत उत्कृष्ट कामगिरी केलेल्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना प्रमाणपत्र देवुन त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी पोलीस महासंचालक सो. यांनी चंद्रपुर जिल्हयातील राजुरा येथे सहाय्यक पोलीस आयुक्त पदी कार्यरत असतांनाच्या आठवणींना उजाळा देत आपल्या संपुर्ण सेवेतील राजुरा येथील सेवा अविस्मरणीय असल्याचे सांगुन गडचिरोली जिल्हयातील पोलीस दलासाठी शासन पाठिशी असुन, पोलीस दलातील अधिकारी कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडविल्या जातील व गडचिरोली जिल्ह्यातील नक्षल चळवळ मोडुन काढण्यासाठी गडचिरोली पोलीस दलास अत्याधुनिक शस्त्र साहीत्य, प्रशिक्षण तसेच इतर सर्व सोयी-सुविधा व मदत पुरविली जाईल असे सांगितले.

यावेळी मा. पोलीस उपमहानिरीक्षक सा. श्री. संदिप पाटिल, गडचिरोली परिक्षेत्र, मा. पोलीस अधीक्षक सा. श्री. अंकित गोयल, गडचिरोली, मा. पोलीस अधीक्षक सा. श्री. निलम रोहन विशेष कृती दल, नागपुर, मा. अपर पोलीस अधीक्षक (अभियान) श्री. मनिष कलवानिया, मा. अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) श्री. समीर शेख, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सौमय मुंडे उपस्थित होते.



